मोटार अपघात दावा क्र. ४२/२०२४
सिमा विरुध्द परमेश्वर व इतर
निशाणी क्रमांक **१२**

**पुढील सरतपास शपथेवर अर्जदारातर्फे ॲड. श्री.आर.ए. सय्यद, विधीज्ञ**

माझ्या सरतपासातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. तो माझ्या सांगण्याप्रमाणे लिहिलेला आहे.

८. मी या कामी उदगीर ग्रामीण पोलस ठाणे अपराध नंबर २७१/२०२४ ची छापील पहिली खबर अपलोड केली आहे. मुळ प्रत मी माझ्या सोबत आणलेली आहे. तिला **निशाणी क्रमांक १३** देण्यात येते.

९. मी या कामी उदगीर ग्रामीण पोलस ठाणे अपराध नंबर २७१/२०२४ ची घटनास्थळ पंचनामा अपलोड केली आहे. मुळ प्रत मी माझ्या सोबत आणलेली आहे. तिला **निशाणी क्रमांक १४** देण्यात येते.

१०. मी या कामी माझ्या पतीचा शव विच्छेदन अहवाल अपलोड केला आहे. त्याची प्रत मी आज माझ्यासोबत आणली आहे. तिला **निशाणी क्रमांक १५** देण्यात येते.

११. मी या कामी दि. २५/०१/२०२४ रोजी प्रमोद गायकवाड याने पोलीस ठाण्यात दिलेली तक्रारीची स्थळप्रत अपलोड केली आहे. त्याची प्रत मी आज माझ्यासोबत आणली आहे. तिला **निशाणी क्रमांक १६** देण्यात येते.

१२. मी या कामी दि. १२/०२/२०२४ रोजी पोलीस अधिक्षक लातूर यांचेकडे मी दिलेली तक्रारीची स्थळप्रत अपलोड केली आहे. त्याची प्रत मी आज माझ्यासोबत आणली आहे. तिला **निशाणी क्रमांक १७** देण्यात येते.

१३. मी या कामी दि. २२/०२/२०२४ रोजी पोलीस महानिरीक्षक, नांदेड यांचेकडे मी दिलेली तक्रारीची स्थळप्रत अपलोड केली आहे. त्याची प्रत मी आज माझ्यासोबत आणली आहे. तिला **निशाणी क्रमांक १८** देण्यात येते.

१४.		मी या कामी सहयाद्री हॉस्पीटल यांचे दि. २६/०१/२०२४ रोजीचे पोलीस निरीक्षक, शिवाजी नगर, लातूर  यांचे पत्र अपलोड केले आहे. त्याची प्रत मी आज माझ्यासोबत आणली आहे.  तिला **निशाणी क्रमांक १९** देण्यात येते.

१५.		मी या कामी मृत्यूच्या कारणाचे प्रमाणपत्र अपलोड केले आहे.  त्याची मुळ प्रत मी आज माझ्यासोबत आणली आहे.  तिला **निशाणी  क्रमांक २०** देण्यात येते.

१६.		मी या कामी प्रेताची पोचपावती अपलोड केली आहे.  त्याची मुळ प्रत मी आज माझ्यासोबत आणली आहे.  तिला **निशाणी क्रमांक २१** देण्यात येते.

१७.		मी या कामी आमची आधारकार्ड अपलोड केली आहेत.  मुळ आधारकार्ड माझ्यासोबत आणलेली आहेत.  त्यांना  **निशाणी क्रमांक २२ ते २६** देण्यात येते.

१८.		मी या कामी उदगीर न्यायालयामध्ये दाखल केलेल्या फौजदारी किरकोळ अर्ज नंबर ११०/२०२४ ची प्रत अपलोड केली आहे. त्याची प्रत माझ्यासोबत आणलेली आहे.  त्यांना  **निशाणी क्रमांक २७** देण्यात येते.

उलट तपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत,

Digitally signed by DIPAK BABALI MHALATKAR
Date: 2025.11.01 10:56:50 +0530

दिनांक – ३१/१०/२०२५

( डी.बी. म्हालटकर )

जिल्हा न्यायाधीश–१, उदगीर